**जमिनीच्या वैधानिक दर्जाबाबत अभिप्राय / ना-हरकत प्रमाणपत्र देताना अवलंबावयाची कार्यप्रणाली...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - एस-१०/२०२५/प्र.क्र.१७२/फ-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ मार्च, २०२६.

**वाचा:-** १) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एस-१०/२०११/प्र.क्र.२८५/फ-३, दि. २३.०८.२०११.
२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एस-१०/२०११/प्र.क्र.२१६/फ-३, दि. ८.०८.२०१३.
३) नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टीपीएस-१८१८/१३४९/प्र.क्र.२२९/१८/ /२०(४)/न.वि.-१३, दि. २०.११.२०१८.

**<u>शासन परिपत्रक :</u>**

शासनाच्या तसेच खाजगी मालकीच्या जमीन खरेदी-विक्री, जमीन विकसित करण्याचे प्रस्ताव (प्रादेशिक योजनांमध्ये एकात्मिकृत नगरवसाहत प्रकल्पासाठी व इतर) तसेच प्रकल्पांसाठी भूसंपादन इ. करिता महसूल विभाग, नगर विकास विभाग तसेच अन्य विकास प्राधिकारणाकडे प्रस्ताव दाखल होत असतात. अशा प्रस्तावांच्या अनुषंगाने संबंधित विभागांकडून / यंत्रणांकडून प्रस्तावित क्षेत्रांच्या/ जिमनींच्या वैधानिक दर्जाबाबत अभिप्रायांची तसेच ना-हरकत प्रमाणपत्रांची मागणी वन विभागाकडे करण्यात येते.

२. वन विभागाकडे उक्त प्रमाणे प्राप्त प्रकरणे निकाली काढताना, वन विभागाच्या संकेतस्थळावर प्रस्तावित क्षेत्राबाबत संक्षिप्त वस्तुस्थिती जनतेच्या माहितीकरिता १५ दिवसांसाठी प्रसिध्द करुन जनतेच्या हरकती असल्यास त्याची नोंद घेऊन वन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांच्याकडून अहवाल घेण्याची व तद्नंतर विविध न्यायालयीन आदेश व वन अधिनियमातील तरतूदींच्या आधारे संबंधित प्रकरणावर प्रशासकीय विभागास्तरावरुन अभिप्राय देण्याची कार्यपध्दती वन विभागाच्या शासन परिपत्रक दि.२३/८/२०११ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे.

३. त्याचप्रमाणे वनक्षेत्राव्यतिरिक्त अन्य वनेत्तर क्षेत्राबाबत भाष्य करणे, ही बाब वन विभागाच्या अखत्यारीतील नसल्याने, अशा प्रकरणातील कार्यवाहीबाबत शासन परिपत्रक दि.८/०८/२०१३ अन्वये मार्गदर्शन सुचना देण्यात आल्या आहेत.

४. तथापि, नगर विकास विभागाच्या उक्त संदर्भ क्र. ३ मधील अधिसूचनेच्या आधारे प्रादेशिक योजनांमध्ये एकात्मिकृत नगरवसाहत प्रकल्पासाठी वन विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरुन परस्पर अभिप्राय देण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

तसेच मौजे कोंढवा बु. ता. हवेली, जि. पुणे येथील राखीव वन क्षेत्राच्या वाटप व अकृषीक वापराच्या अनुषंगाने वन विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरुन देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रामुळे वन कायद्यांतील तरतूदींचे उल्लंघन होण्याची बाब उद्भवली व कायदेशीर पेच निर्माण झाला. सदर

प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. १५/०५/२०२५ रोजी अंतीम आदेश देऊन सदरचे क्षेत्र राखीव वन असल्याचे स्पष्ट केले आहे.

**५.** यापार्श्वभूमीवर उक्त संदर्भ क्र. १ व २ शासन परिपत्रकांन्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच वनक्षेत्राच्या निर्वनीकरणाबाबतचे अभिप्राय आणि प्रादेशिक योजनांमध्ये एकात्मिकृत नगरवसाहत प्रकल्पासाठी व इतर विकास प्रकल्प, जमिनीच्या हस्तांतरणाच्या अनुषंगाने वैधानिक दर्जाबाबत अभिप्राय / ना हरकत प्रमाणपत्र वन विभागाच्या क्षेत्रिय स्तरावरुन परस्पर देण्यात येऊ नये, सदर प्रकरण शासनस्तरावर मान्यतेस्तव सादर करावी.

**६.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०३०९१८१११९७३१९ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVIKIRAN SABAJI GOVEKAR

Digitally signed by RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=223DBAF509E56A22DD8C9D33C199767837144D5824E7011745D9A521FDBEDAD3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B752370B557D0A3E58B4B069230BC54F6A13D04798D2EE7A3F1C7DCC5655271C, cn=RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
Date: 2026.03.09 18:13:48 +05'30'

**( डॉ. रविकिरण गोवेकर )**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**
**महाराष्ट्र शासन**

**<u>प्रत :</u>**

१) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
२) अपर मुख्य सचिव (वने व भूसंपादन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (नगर विकास विभाग), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (सर्व)
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे
११) उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१२) निवडनस्ती